आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२४ नोव्हेंबर २०२५ - सोमवार

**ठळक बातम्या**

- मुख्य धारेत परतण्यासाठी १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत सशस्त्र कारवाई थांबवण्याचं नक्षलवाद्यांचं सरकारला आवाहन

- देशाचे ५३ वे सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत यांचा शपथविधी

- ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांचं मुंबईत निधन, देशभरातून शोक व्यक्त

- डेफ-ऑलिंपिक क्रीडा स्पर्धेत प्रांजली धुमाळ आणि सुमित दहियाला सुवर्ण पदक

आणि

- कबड्डीच्या विश्वचषकाला सलग दुसऱ्यांदा भारतीय महिला संघाची गवसणी

**<><><><><>**

सशस्त्र संघर्ष सोडून मुख्य धारेत येण्याची आपली इच्छा असून १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत सुरक्षा दलांची कारवाई स्थगित करावी अशी मागणी करणारं पत्रक नक्षली संघटनेच्या एमएमसी झोन अर्थात महाराष्ट्र-मध्यप्रदेश-छत्तीसगड प्रदेश समितीने तिन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या नावे जारी केलं आहे. अनंत या नावाने नक्षली प्रवक्त्याने हे पत्रक जारी केलं आहे. सशस्त्र संघर्षाला विराम देण्याची आपली इच्छा असून आपसात संवाद साधण्यासाठी फेब्रुवारी पर्यंतची वेळ हवा असल्याचं या पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

देशाचे ५३ वे सरन्यायाधीश म्हणून आज न्यायमूर्ती सूर्य कांत यांनी शपथ घेतली. नवी दिल्लीत राष्ट्रपती भवन इथं आयोजित समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना पदाची शपथ दिली. उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, लोकसभेचे सभापती ओम बिरला, तसंच केंद्रीय मंत्रिमंडळाचे सदस्य यावेळी उपस्थित होते. न्यायमूर्ती सूर्यकांत संवैधानिक आणि दिवाणी कायदेक्षेत्रातले तज्ज्ञ असून २०१९ पासून  सर्वोच्च न्यायालयात न्यायदान करत आहेत. सरन्यायाधीशपदाचा त्यांचा कार्यकाळ १५ महिन्यांचा असेल.

**<><><><><>**

राजकीय पक्षांना रोख स्वरुपात दिल्या जाणाऱ्या देणग्यांप्रकरणी सर्वोच्च न्यायालयानं केंद्र सरकार, निवडणूक आयोग आणि राजकीय पक्षांना नोटीस बजावली आहे. राजकीय पक्षांना २ हजार रुपयांपेक्षा कमी रकमेच्या दिल्या जाणाऱ्या देणग्या बेनामी असतात. हे आयकर कायद्याचं उल्लंघन असल्याचा दावा करत दाखल झालेल्या याचिकेच्या सुनावणीनंतर न्यायालयानं नोटीस बजावली.

<><><><><>

फसवणुकीसाठी वापरल्या गेलेल्या २१ लाखापेक्षा जास्त मोबाईल क्रमांकांवर आणि एक लाखापेक्षा जास्त व्यक्ती किंवा यंत्रणांविरुद्ध TRAI म्हणजेच भारतीय दूरसंवाद नियामक प्राधिकरणाने कारवाई केली आहे.

<><><><><>

उत्तराखंडमधे टिहरी जिल्ह्यात कुंजापुरी मंदिरानजीक आज एक बस नदीत कोसळून ५ जणांचा जागीच मृत्यू झाला, तर १३ जण जखमी झाले. जखमींपैकी ५ जणांची प्रकृती गंभीर असून त्यांना ऋषिकेश इथल्या एम्स रूग्णालयात दाखल केलं आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या अयोध्येतल्या राम मंदिराला भेट देणार आहेत. मंदिराचं बांधकाम पूर्ण झाल्याचं प्रतीक म्हणून राम मंदिराच्या कळसावर त्यांच्याहस्ते औपचारिक ध्वजारोहण होईल.

<><><><><>

माहे ही पाणबुडी विरोधी युद्धनौका आज मुंबईत नौदलाच्या ताफ्यात दाखल झाली. कोचिन शिपयार्डनं बनवलेल्या या नौकेत ८० टक्क्यांपेक्षा जास्त सामुग्री स्वदेशी बनावटीची आहे. उथळ पाण्यातही ही नौका चालू शकते. माहे श्रेणीतल्या ८ नौकांपैकी ही पहिली नौका आहे. लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यावेळी उपस्थित होते. भविष्यातल्या आव्हांनाना तिन्ही सैन्य दलांनी मिळून सामोरं जाण्याची गरज असल्याचं ते यावेळी म्हणाले.

<><><><><>

विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्राच्या विकासासाठी समाजानं योगदान द्यावं असं आवाहन केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री जितेंद्र सिंग यांनी केलं. राष्ट्रीय क्वांटम मिशन अंतर्गत आयआयटी मुंबईत ७२० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते.

क्वांटम तंत्रज्ञान शिकवण्यासाठी देशातल्या १०० अभियांत्रिकी महाविद्यालयात सुविधा निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचं विज्ञान तंत्रज्ञान सचिव अभय करंदीकर म्हणाले.

**<><><><><>**

भटक्या कुत्र्यांचं सक्तीचं लसीकरण करण्याचं आणि नागरिकांच्या तक्रारींचं निवारण करण्यासाठी स्वतंत्र हेल्पलाइन करण्याचे आदेश राज्य सरकारनं सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सरकारनं हा शासन आदेश आज जारी केला. निर्धारित नसलेल्या ठिकाणी भटक्या कुत्र्यांना खाऊ घालणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेशही सरकारनं दिले.

**<><><><><>**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ५ हजार रुपयांच्या नोटा जारी करणार असल्याच्या दाव्याच्या आरोपांचे सरकारने खंडन केले आहे. प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरोच्या फॅक्ट चेक युनिटने हा दावा खोटा असून रिझर्व्ह बँकेने असा कोणताही निर्णय घेतलेला नाही असे स्पष्ट केले आहे.

**<><><><><>**

सुप्रसिद्ध अभिनेता धर्मेंद्र यांचं आज निधन झालं. ते ८९ वर्षांचे होते. काही दिवसांपूर्वी त्यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे रुग्णालयात दाखल केलं होतं. मात्र, उपचारांनंतर त्यांना घरी सोडण्यात आलं होतं. आज त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पार्थिवावर मुंबईत पवनहंस स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी त्यांच्या कुटुंबियांसह निकटवर्तीय उपस्थित होते. धर्मेंद्र यांच्या निधनामुळे पंजाबमधल्या फगवाडा या त्यांच्या गावीही शोककळा पसरली आहे. धर्मेंद्र यांच्या कारकिर्दीविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**- - होल्ड व्हाइस कास्ट - -**

*(६५ वर्षांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत ३०० हून जास्त चित्रपटांमधे भूमिका करणारे धर्मेंद्र यांनी १९६० मधे दिल भी तेरा हम भी तेरे या चित्रपटातून रुपेरी पडद्यावर पदार्पण केलं. देखणं रुबाबदार व्यक्तिमत्व आणि संवेदनशील चेहरा या वैशिष्ट्यांच्या बळावर धर्मेंद्र यांनी कविमनाच्या रोमँटिक नायकाच्या भूमिका साकारल्या, तसंच ॲक्शन हिरोच्या भूमिकांमुळे*

*ते हिंदी चित्रपटसृष्टीचे 'ही मॅन' म्हणून प्रसिद्ध झाले. अभिनयात विनोदाची डूब देणारा त्यांचा नायकही प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला.*

*बंदिनी, हकिकत, शोले, गुड्डी, सीता और गीता, लोफर, यादों की बारात, चुपके चुपके, शोले, चाचा भतीजा, द बर्निंग ट्रेन, राम बलराम अशा अनेक गाजलेल्या चित्रपटांमधे त्यांनी भूमिका साकारल्या होत्या. आगामी इक्कीस या चित्रपटातही त्यांची भूमिका आहे.*

*काही बंगाली आणि पंजाबी चित्रपटांसह छोट्या पडद्यावरही त्यांनी अनेक लोकप्रिय कार्यक्रमांमधे भाग घेतला. अभिनयाखेरीज त्यांनी निर्मिती संस्थेची स्थापना करून बेताब, घायल, बरसात अशा विविध चित्रपटांची निर्मिती देखील केली होती. त्यांनी तयार केलेल्या घायल चित्रपटाला राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळाला होता. चित्रपट क्षेत्रातल्या कामगिरीबद्दल त्यांना फिल्मफेअरचा जीवन गौरव पुरस्कार मिळाला होता. तसंच पद्मभूषण सन्मानानं त्यांना गौरवण्यात आलं होतं. २००४ ते २००९ या काळात त्यांनी लोकसभेत बिकानेर मतदारसंघाचं प्रतिनिधित्व केलं.*

*अतिशय लोकप्रिय अभिनेते धर्मेंद्र यांच्या निधनानं भारतीय चित्रपटसृष्टीचं मोठं नुकसान झालं आहे. कलाकारांच्या अनेक पिढ्यांनी त्यांच्याकडून प्रेरणा घेतली होती, घेत राहतील, या शब्दात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना आदरांजली अर्पण केली. उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनीही धर्मेंद्र यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. धर्मेंद्र यांच्या निधनामुळे हिंदी चित्रपटसृष्टीतल्या एका महान पर्वाचा अंत झाल्याची शोकभावना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली आहे. भारतीय चित्रपटसृष्टीचा सुवर्णकाळ गाजवणारा लखलखता तारा निखळल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली आहे.*

*ज्येष्ठ नेते शरद पवार, राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे, चित्रपट सृष्टीतल्या अनेक मान्यवरांनाही धर्मेंद्र यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.)*

<><><><><>

गोव्यात सुरू असलेल्या इफ्फी अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात आज घर हा कोंकणी भाषेतला लघुपट दाखवण्यात आला. घर हे चार भिंतीपेक्षा अधिक काहीतरी आहे, या संकल्पनेवर हा लघुपट आधारलेला आहे. यात रवी किशोर, रोहित खांडेकर, शार्दुल बोरकर आणि विकास कासलीवाल यांच्या भूमिका असून किशोर अर्जुन यांनी त्याचं दिग्दर्शन केलं आहे.

<><><><><>

जपानमध्ये टोकिओ इथं सुरू असलेल्या, डीफ-ऑलिंपिक क्रीडा स्पर्धेत भारताच्या प्रांजली धुमाळनं महिलांच्या २५ मीटर पिस्टल नेमबाजीत सुवर्ण पदक पटकावलं. या स्पर्धेतलं तिचं हे तिसरं पदक आहे. याआधी तिनं एक सुवर्ण आणि एक रौप्य पदक पटकावलं आहे.

पुरुषांच्या ९७ किलो फ्री स्टाईल कुस्तीत सुमीत दहियानं सुवर्ण पदक पटकावलं, तर ८६ किलो फ्री स्टाईल कुस्तीत अमितनं रौप्य पदक पटकावलं.

<><><><><>

भारताच्या महिला कबड्डी संघानं सलग दुसऱ्यांदा कबड्डी विश्वचषकाला गवसणी घातली आहे. ढाका इथं झालेल्या सामन्यात त्यांनी आज चायनीज तैपेईच्या संघावर ३५-२८ अशी मात केली. या स्पर्धेतल्या सर्व सामन्यात भारतीय संघ अजिंक्य राहिला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या कामगिरीबद्दल या संघाचं अभिनंदन केलं आहे.

<><><><><>

गुवाहाटी इथं सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात तिसऱ्या दिवसअखेर दक्षिण आफ्रिकेनं भारतावर एकूण ३१४ धावांची आघाडी घेतली आहे. काल दक्षिण आफ्रिकेनं पहिल्या डावात ४८९ धावा केल्या, आणि आज भारताचा पहिला डाव २०१ धावांवर रोखला. भारताची सुरुवात चांगली झाली, मात्र नंतर फलंदाजी ढेपाळली. यशस्वी जैस्वालच्या ५८ आणि वॉशिंग्चन सुंदरच्या ४८ धावा वगळता अन्य फलंदाजांना चांगली कामगिरी करता आली नाही. दक्षिण अफ्रिकेतर्फे मॅक्रो जॅन्सननं ६, तर सायमन हार्मरनं ३ गडी बाद केले. आजचा खेळ थांबला तेव्हा दक्षिण आफ्रिकेच्या, दुसऱ्या डावात बिनबाद २६ धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//